# ऋणनिर्देश

प्रस्तुत प्रबंधिकेचे लेखन करताना मला अनेकांचे विविध प्रकारे सहकार्य लाभले. असे प्रेमळ व निरपेक्ष सहकार्य लाभणे ही मोठ्या भाग्याची गोष्ट आहे.

माझ्यावर अपार ऋण आहे ते माझ्या मार्गदर्शक गुरू प्रा. डॉ. सौ. शुभांगी शशिकांत भुतकर यांचे. चिकित्सक मार्गदर्शनाबरोबरच अनेक संदर्भ उपलब्ध करून देण्यापर्यंत अनेक गोष्टीत त्यांनी मला सहाय्य केले आहे. त्यांचे आभार मानण्यापेक्षा त्यांच्या ऋणातच सैदव राहणे मला आनंददायक होणार आहे.

शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागातील डॉ. विश्वनाथ शिंदे, डॉ. कृष्णा किरवले, डॉ. रविंद्र ठाकूर यांच्याशी प्रबंधिकेच्या विषयाच्या संदर्भात केलेल्या चर्चा मला फार उपयुक्त वाटल्या. वेळोवेळी दिलेल्या सूचना व मार्गदर्शन यामुळे मला खूप प्रोत्साहन मिळाले. या सर्वांचा मी विशेष आभारी आहे.

छत्रपती शिवाजी कॉलेजचे प्राचार्य जे.जी.जाधव, प्राचार्य शशिकांत नारायण भुतकर यांनी बहुमोल असे मार्गदर्शन केले. त्यांच्या योग्य मार्गदर्शनामुळे मला प्रोत्साहन मिळाले. या कॉलेजमधील मराठी विभागातील सर्वांचे सहकार्य मला लाभले. या सर्वांचे ऋण न फिटणारे आहे.

श्री. सतीश जाधव यांनी त्यांच्या साहित्याबद्दल दूरध्वनीवरून मनमोकळेपणाने केलेली चर्चा मला अत्यंत उपयुक्त ठरली. आपला अमूल्य वेळ देऊन आवश्यक तेथे मार्गदर्शन केले त्याबद्दल मी त्यांचे आभार व्यक्त करतो.

छत्रपती शिवाजी कॉलेजचे ग्रंथालय, बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय, कोल्हापूर, नगरवाचनालय,सातारा, दहिवडी कॉलेजचे ग्रंथालय या ठिकाणाहून मिळालेले संदर्भ ग्रंथ या प्रबंधिकेसाठी मोलाचे आहेत. या सर्व ग्रंथालयातील ग्रंथपाल, सेवकांची मला सतत मदत मिळाली त्याबद्दल मी त्यांचे विशेष आभार मानतो.

माझ्यासाठी अपार कष्ट करणारे माझे परमपूज्य आई - वडिल यांनी मला शिकविण्यासाठी कसोशीने प्रयत्न केले. माझी आई सौ. शांताबाई वडिल श्री. ज्ञानदेव नामदेव यादव आणि माझे प्रेमळ मामा शहाजी मारूती खांडे यांचा आशीर्वाद सदैव माझ्या पाठीशी असल्यामुळेच मी उच्च शिक्षणापर्यंतचा प्रवास करू शकलो. तेव्हा त्यांच्या ऋणात राहणेच मला अधिक आवडेल.

माझ्या संशोधन कार्याला सदैव प्रेरणा देणारे माझे भाऊ चंद्रकांत यादव, बहीण विजया यादव या सर्वांचे माझ्यावर अपार ऋण आहेत.

नामदेवराव सूर्यवंशी (बेडके) महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. राजेंद्र वामनराव कुलकर्णी यांनी संशोधन पूर्ण करण्यास मदत केली मी त्यांच्या विषयी कृतज्ञता व्यक्त करतो.

या प्रबंधाचे अत्यंत तत्परतेने कॉम्प्युटर टायपिंग व सुबक बांधणी करून देणारे शितल एंटरप्रायजेसचे श्री. सुरेश भस्मे आणि इम्रान शेख यांचाही मी आभारी आहे.

या सर्वांखेरीज ज्यांचा प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे या संशोधन कार्यास हातभार लागला परंतु नामनिर्देश करण्याचे राहिले असेल अशा सर्वांचे मी मनापासून हार्दिक आभार मानतो.